MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# सार्वजनिक सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे सूचित करण्यात येते की, मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ("आयोग") यांनी प्रकरण क्र. 163/2024 मध्ये दिनांक 09 **डिसेंबर** 2025 व 26 **मे** 2026 रोजी पारित केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने, **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (म.रा.वि.वि.कं.मर्या.)** यांचेकडून वीजपुरवठा उपलब्ध करण्यासाठी उपकेंद्रे, रोहित्रे (ट्रान्सफॉर्मर्स) व इतर संबंधित विद्युत पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या योग्य जमीन / जागा / बांधकाम क्षेत्राच्या क्षेत्रफळाबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याच्या संदर्भात सर्व हितधारकांकडून सूचना व अभिप्राय मागवत आहे.

दिनांक 26 **मे** 2026 च्या आदेशातील संबंधित उतारा खालीलप्रमाणे आहे:

> "4. **आयोग, दिनांक** 09 **डिसेंबर** 2025 **च्या दैनंदिन आदेशामध्ये नमूद केलेल्या पद्धतीनुसार सार्वजनिक सल्लामसलत प्रक्रिया राबविण्याचे निर्देश म.रा.वि.वि.कं. लि. ला देत आहे......"**
>
> *(संबंधित उतारा)*

## 1. सूचना/अभिप्राय मागविणे

आयोगाच्या वरील निर्देशांचे पालन करण्यासाठी, वीजपुरवठा करण्यासाठी उपकेंद्रे, रोहित्रे (ट्रान्सफॉर्मर्स) व इतर संबंधित विद्युत पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या जमीन / जागा / बांधकाम क्षेत्राच्या क्षेत्रफळाबाबत योग्य मार्गदर्शक तत्त्वे तयार व अंतिम करण्यासाठी म.रा.वि.वि.कं. लि. सर्व हितधारकांकडून सूचना व अभिप्राय मागवत आहे.

ही मार्गदर्शक तत्त्वे यापूर्वी **पत्र क्र. ED(Dist.-II)/M-I/Guidelines/35530 दिनांक** 14.11.2024 व **CE-Dist/M-I/Revised Guidelines/14792 दिनांक** 13.05.2025 द्वारे जारी करण्यात आली होती. त्याच्या प्रती म.रा.वि.वि.कं. लि.च्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा खालील लिंकवर उपलब्ध आहेत:

https://www.mahadiscom.in/custom/distribution-section-circulars.php

## 2. सूचना/अभिप्राय सादर करण्याची पद्धत

सूचना व/किंवा अभिप्राय सादर करू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने ते **मराठी किंवा इंग्रजी** भाषेत खालील ई-मेल पत्त्यावर पाठवावेत: **cedist.msedclfeedback@gmail.com**

वरील सुविधेचा वापर करण्यात काही अडचण आल्यास, हितधारकांनी **श्री. नितीन काळे, अधीक्षक अभियंता** यांच्याशी **मोबाईल क्रमांक** +91 7045654042 वर **सकाळी** 10.00 **ते सायंकाळी** 5.00 या वेळेत (कामकाजाच्या दिवशी) संपर्क साधावा.

ई-मेलद्वारे सूचना/अभिप्राय सादर केलेल्या व्यक्तींना त्याची हार्ड कॉपी सादर करण्याची आवश्यकता नाही.

ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमे उपलब्ध नाहीत त्यांनी आपले सूचना/अभिप्राय हार्ड कॉपी स्वरूपात खालील पत्त्यावर पाठवावेत:

**कार्यकारी संचालक (वितरण-II),** कार्यकारी संचालक (वितरण-II) यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, 5 वा मजला, प्रकाशगड, प्लॉट क्र. G-9, वांद्रे (पूर्व),
मुंबई – 400051.

वरील नमूद केलेल्या माध्यमांशिवाय इतर कोणत्याही माध्यमातून प्राप्त सूचना/अभिप्राय विचारात घेतले जाणार नाहीत.

## 3. सूचना/अभिप्राय सादर करण्याची अंतिम मुदत

सूचना व/किंवा अभिप्राय **दिनांक** 24.07.2026 रोजी **सायंकाळी** 5.00 **वाजेपर्यंत** ई-मेलद्वारे किंवा हार्ड कॉपी स्वरूपात सादर करता येतील. 24.07.2026 **रोजी सायंकाळी** 5.00 **नंतर प्राप्त होणाऱ्या सूचना/अभिप्रायांचा विचार करण्यात येणार नाही.**

## 4. सार्वजनिक सल्लामसलत

वरीलप्रमाणे सूचना/अभिप्राय सादर केलेल्या हितधारकांना सार्वजनिक सल्लामसलतीदरम्यान प्रत्यक्ष उपस्थित राहून आपले मत मांडायचे असल्यास, त्यांनी सूचना/अभिप्राय सादर करतानाच त्याबाबत स्पष्ट उल्लेख करावा. अशा प्रकरणांमध्ये **वैध ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक देणे बंधनकारक राहील.**

सार्वजनिक सल्लामसलत बैठक **दिनांक** 30.07.2026 **रोजी दुपारी** 3.00 **ते सायंकाळी** 5.00 या वेळेत खालील ठिकाणी आयोजित करण्यात येईल:

**कॉर्पोरेट कार्यालय, म.रा.वि.वि.कं. लि.,**
**6 वा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई** – 400051

तसेच **व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC)** द्वारेही सहभागाची सुविधा उपलब्ध राहील.

या बैठकीत हितधारकांना त्यांच्या सूचना/अभिप्राय सादर करण्याची व त्यावर चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग बैठकीची लिंक प्राप्त करण्यासाठी हितधारकांनी **श्री. नितीन काळे, अधीक्षक अभियंता** यांच्याशी **मोबाईल क्रमांक** +91 7045654042 वर संपर्क साधावा.

**स्थळ : मुंबई**
**दिनांक :** 03.07.2026

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**यांच्यावतीने व त्यांच्या आदेशानुसार**

**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**